नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 13/01/2022 (गुरूवार)
(सकाळ)

---

## घरफोडी

पो.स्टे. मौदा :– अंतर्गत 18 कि. मी. अंतरावरील महालगाव येथे दिनांक 21/12/2021 चे 14.00 वा. ते दिनांक 12/01/2022 चे 10.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– वसीम सिद्धीकी बावला वय 33 वर्ष रा. प्लॉट न 22 शांती नगर, रोड अंजनी मजिद जवळ नागपूर महालगाव यांचे गोडाउनचे कुलुप अज्ञात आरोपीने तोडुन आत प्रवेश केला. यानंतर आरोपीने गोडावुन मधील 41 पोते सुपारी चे प्रति 80 किलो एकुण 3 टन 200 किलो सुपारी प्रति 120/–रु. कि एकुण 3,84,000/–रू. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम 457, 380 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक देवेन्द्र भुरे मो.क्र 7722003342 हे करीत आहे.

## चोरी

पो.स्टे. मौदा :– अंतर्गत 15 कि. मी. अंतरावरील कढोली आठवडी बाजार कामठी येथे दिनांक 12/01/2022 चे 14.30 वा. ते 18.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– सौ. राधा सिधू मेश्राम, वय 41 वर्ष, रा. वार्ड क्र. 1 कढोली ता कामठी या कढोली येथील आठवडी बाजारात नेहमी प्रमाणे भाजीपाला घेण्याकरीता गेल्या होत्या. त्यादरम्यान महिला आरोपी नामे– संगीता मेवालाल खडसे, वय 40 वर्ष, रा. वाघधरवाडी कन्हान हिने फिर्यादीचे गडयातील 1 सोन्याची पोत 3 ग्रॅम चा लॉकेट, 6 ग्रॅम चे गहू मनी व 1 ग्रॅमचे बारीक मनी एकुण 6,000/–रु. चा सोन्याची पोत 3 ग्रॅमचा लॉकेट, 10 कारले मनी, 5 ग्रॅम 1 ग्रॅम चे बारीक मनी कि. 7,000/–रु. असा एकुण कि. 13,000/–रु. चा मुद्देमाल चोरुन नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम 380, 34 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि बिरोले मो.क्र. 9423701263 हे करीत आहे.

# मोटरसायकल चोरी

पो.स्टे. काटोल :– अंतर्गत 2 कि. मी. अंतरावरील अरविंद बॅक समोर मेन रोड काटोल येथे दिनांक 12/01/2022 चे 13.00 वा. ते 13.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– प्रविण शेषराव खंडाते वय 23 वर्ष रा. अंबाडा सोनक यांची जुनी वापरती एम.एच.– 31/डीडब्लु– 9585 क्रमांकाची पल्सर 150 मोटरसायकल ही उभी करून बंद पडलेले एटीएम. कार्ड सुरू करण्याकरिता बॅकेचे आतमध्ये गेले होते. त्यादरम्यान फिर्यादीची किंमती 10,000/– रू. ची मोटरसायकल अज्ञात आरोपीने चोरून नेली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार प्रभुदास दलाल मो. नं. 9561564852 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर